# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन


ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन:०२०-२९५१६२६४ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल: amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०२/२०२६

## जिल्हा :पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३१.५ ते ३३.५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १४.० ते १८.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७१ ते ९६ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता २६ ते ३१ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १.८ ते ३.० कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३१ ते ३४ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १५ ते १७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४९ ते ६१ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३३ ते ३७ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०२ ते ०५ कि .मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील . वाऱ्याची दिशा वायव्येकडून आग्रेयेकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (११/०२/२०२६ ते १७/०२/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७/०२/२०२६ ते २१/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | दिनांक | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 32.4 | 31.5 | 31.5 | 31.6 | 32.7 | 33.5 | 33.0 | कमाल तापमान(अं.से.) | 32 | 31 | 33 | 33 | 34 |
| 15.1 | 14.5 | 14.4 | 14.0 | 15.4 | 15.0 | 18.5 | किमान तापमान(अं.से.) | 17 | 15 | 16 | 16 | 15 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 1 | 1 | 2 | 2 |
| 90 | 79 | 96 | 92 | 81 | 86 | 71 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 61 | 60 | 56 | 51 | 49 |
| 28 | 31 | 27 | 26 | 26 | 26 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 36 | 37 | 37 | 33 | 33 |
| 1.8 | 2.9 | 3.0 | 2.6 | 2.8 | 1.8 | 2.7 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 2 | 4 | 5 | 5 | 5 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 141 | 90 | 4 | 98 | 110 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १७ ते २१ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १५ ते २१ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाची शक्यता नाही.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | सुरु ऊसाला एका आड एक सरीतून पाणी दयावे व पीक तणविरहीत ठेवावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी ऊसाचे पाचट सरीमध्ये आच्छादन म्हणून वापरावे. ज्या ठिका णी पट्टा पध्दतीने लागण केलेली आहे अशा ठिकाणी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब करावा. |
| गहू | दाणे भरण्याची अवस्था | गरजेनुसार व जमिनीच्या मगदुराप्रमाणे गहू पिकास पाणी द्यावे. मावा किडीच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम ॲनिसोप्ली ५० ग्रॅम किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० ग्रॅम किंवा व्हरटीसिलीयम लेकॅनी ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मावा किडीचे रासायनिक पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी थायामेथो झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार १ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून गरजेप्रमाणे १५ दिवसांचे अंतराने एक किंवा दोन फवारण्या कराव्यात. |
| उन्हाळी भुईमूग | पीक वाढीची अवस्था | पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत. भुईमूगातील कार्यक्षम तण व्यवस्थापनाकरीता पेरणीनंतर लगेच पेंडीमिथॉलिन १.०० किलो क्रि. घ. प्रति हेक्टरी १० लिटर पाण्यातुन ओलीवर फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरण्याची अवस्था | ज्वारी पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% ची फवारणी करावी. बागायती ज्वारीमध्ये मध्यम जमिनीत पाणी कणसात दाणे भरतांना पेरणीनंतर ९० ते ९५ दिवसांनी द्यावे. भारी जमिनीत ज्वारीला चौथ्या पाण्याची गरज भासत नाही. |
| करडई | बोंडे भरण्याची अवस्था | आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार पिकास पाणी द्यावे. पिकास पाण्याचा जास्त ताण पडू देऊ नये. जास्त पाण्यामुळे पीक मोठ्या प्रमाणात मर रोगास बळी पडते म्हणून करडई पिकास उपलब्धतेनुसार हलके पाणी द्यावे. |
| हरभरा | घाटे भरण्याची अवस्था | हरभरा पीक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पीक उभळते. पिकास दिलेली खते व्यवस्थित उपलब्ध होण्यासाठी व उत्पादनामध्ये मोठी वाढ होण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. हरभरा पिकावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. मावा किडीच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम ॲनिसोप्ली ५० ग्रॅम किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० ग्रॅम किंवा व्हरटीसिलीयम लेकॅनी ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. पीक घाटे भरण्याच्या अवस्थेमध्ये पाण्याचा ताण पडल्यास २ टक्के युरीयाची पहिली फवारणी करावी आणि त्यानंतर १०-१५ दिवसांनी दुसरी फवारणी २ टक्के पोटॅशिअम नायट्रेटची करावी (२०० ग्रॅम / १० लिटर). |
| कांदा (रांगडा) | पीक वाढीची अवस्था | फुलकिडीच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मि.ली. किंवा टोलफेनपायरॅड १५ ई.सी.२ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन ११ ई.सी. ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून आलटुन पालटून फवारण्या कराव्यात. अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. करपा / मानमोड्या/ मानेचा पीळ रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मि.ली. १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल २५.९ टक्के ई.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४१% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन ११% + टेब्युकोनॅझोल १८.३% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा किटाझिन ४८% इ.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून १० दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून बागेबाहेर जाळावीत तसेच केळीची पिल्ले धारदार कोयत्याने नियमित काढावीत. तसेच मेटीरम ५५ टक्के + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्लु जी) ३० ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. |
| द्राक्ष | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या वातावरणामुळे द्राक्ष मण्यांचा आकार कमी होऊ नये यासाठी बोदावर आच्छादन करावे. केवडा रोगाच्या नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील एम ४ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के डब्लु. पी. (०.२%) किंवा सायमो क्झॅनील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के डब्लु.पी (०.२%) किंवा फिनॅमिडॉन १० टक्के + मॅन्कोझेब ५० टक्के डब्लु.जी. (०.२५%) या बुरशीनाशकांच्या फवारण्या १२ दिवसांचे अंतराने आलटून-पालटून कराव्यात. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी मायक्लोब्युटॅनील १०% डब्ल्यु पी ४ ग्रॅ./१० लि.पाणी किंवा डायफेनकोनॅझोल २५ ई.सी. ५ मिली./१० लिटर पाणी किंवा पेनकोनॅझॉल १०% इ.सी. ५ मिली/१० पाणी किंवा सल्फर ८० डब्ल्यु पी २५ ग्रॅ./१० लिटर पाणी किंवा सल्फर ८० डब्ल्यु डि.जी. १५ ते २० ग्रॅम / १० लिटर पाणी किंवा डायमिनोमार्क ५०% डब्ल्यू पी. १ ग्रॅम प्रति लिटर किंवा फोसेटाइल ए.एल. २ ग्रॅम प्रति लिटर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट ५ ग्रॅ./१० लिटर किंवा हेक्झाकोनेझॉल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी करताना मण्यांवर डाग येणार नाही व काढणी पश्चात औषधांचे अंश रहाणार नाहीत अशा औषधांची निवड करावी. निर्यातक्षम द्राक्षासाठी ॲम्पेलोमायसिस क्विसक्विलीस बुरशीचा ५ ग्रम किंवा ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| आंबा | पीक वाढीची अवस्था | आंबा मोहोर आल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कीटकनाशक आणि बुरशीनाशकाची फवारणी करावी. सध्याच्या ढगाळ हवामानामुळे आंब्यावरील तुडतुडे या किडीच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेझिन २५% एस.सी. २० मिली किंवा इमिडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल. ३ मिली किंवा लॅम्डा सायहॅलोथ्रिन ५% इ.सी. १० मिली प्रति १० |

| | | |
|---|---|---|
| | | लीटर पाण्यात मिसळून फवारावे. मोहरावरील करपा रोगाच्या नियंत्रणसाठी पहिली फवारणी डोळे फुटताच ॲझॉक्झीस्ट्रॉबीन २३% एस.सी. १० मिली/१० लि. पाण्यात मिसळून करावी. आंबा मोहरावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी पीक फुलोऱ्यात असताना कार्बेन्डॅझीम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यू.पी. (२० ग्रॅम/१० ली पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या दहा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात किंवा कार्बेन्डॅझीम ५० डब्ल्यू.पी. १ ग्रम प्रति लिटर पाणी किंवा हेक्झाकोन्याझोल १ मिली प्रति लिटर पाणी किंवा ८० डी.डब्ल्यू.जी. सल्फर २ ग्रम प्रति लिटर पाण्यातून फवारावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | उन्हाळी हंगामात जनावराना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : १७.०२.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**